# CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION COMPANY LTD.

Old Power House Premises, Dr. Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No:- CGRF/AZ/AUR/U/ 553 / 2015 / 16 Date :-

To,
01) The Executive Engineer ( Administration)
Nodal Office, O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

*Sub:-* Forwarding of grievance in respect of Shri Vishnu Kishanrao Dawne, R 6 / 29 S.T. Colony , Ayodhya Nagar, Bajajnagar, Aurangabad 431 001. ( Consumer No. 492130369707 )

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum, in respect of Shri Vishnu Kishanrao Dawne, R 6 / 29 S.T. Colony , Ayodhya Nagar, Bajajnagar, Aurangabad 431 001.

You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 07.04.2015 at 12.00 Hours.

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad

Encl: As above

Copy to:-
Shri Vishnu Kishanrao Dawne,
R 6 / 29 S.T. Colony , Ayodhya Nagar,
Bajajnagar, Aurangabad 431 001.

## ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/औबाद/ग्रामीण / ५५३ / २०१५ / १६**

**तक्रार दाखल दिनांक - २६.०३.२०१५**
**निकाल दिनांक - ०५.०५.२०१५**

**श्री. विष्णु किशनराव दवणे तक्रारदार**
**आर - ६ / २९ एस.टी. कॉलनी,**
**अयोध्यानगर, बजाजनगर , औरंगाबाद .**

**विरुध्द**

**कार्यकारी अभियंता ( प्रशासन ),**
**नोडल ऑफीस, ग्रामिण मंडळ ,**
**एम.एस.ई.डी.सी.एल. औरंगाबाद गैरअर्जदार**

**मंच सदस्य**

**डॉ. भास्कर गो.पालवे, अध्यक्ष**
**श्री. विलासचंद्र . सु. काबरा सदस्य**
**श्री.नामदेव रा.गांधले सदस्य / सचिव**

## निर्णय

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचा निर्णय**

अर्जदार श्री. विष्णु किसनराव दवणे, मु.आर- ६ / २९, एस.टी. कॉलनी, अयोध्यानगर, बजाजनगर, औरंगाबाद यांनी यांनी दिनांक २३.०३.२०१५ रोजी कार्यकारी अभियंता ( प्रशासन )

पान क्र.२

नोडल ऑफीस ग्रामिण मंडळ, महावितरण, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विदयुत लोकपाल ) विनिमय २००६ तील अनुसुचि अ नमुन्यात तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. सदर तक्रारीचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे.

अर्जदार श्री. विष्णु किसनराव दवणे हे महावितरण कंपनीचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९२१३०३६९७०७ असा आहे त्यांनी अतिरीक्त आकार रदद करुन नवीन विज बिलाची विभागणी व्यवस्थित करुन माहे फेब्रुवारी २०१५ चे विज बिल रदद करुन नवीन सुधारीत विज बिल देण्यात यावे अशी मागणी केलेली आहे.

अर्जदार हे दिनांक १ डिसेंबर २००५ पासुन घरगुती सिंगल फेज वापराचे ग्राहक आहेत त्यांचे म्हणण्यानुसार कंपनीकडून आलेल्या बिलाचा भरणा ग्राहकाने वेळोवेळी केलेला आहे, परंतु मिटर वाचक यांनी नेहमी सरासरी वर आधारीत रिडीग न घेता विज बिल आकारण्यात आले परंतु माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये एकत्रित युनिट १४४७ त्याची विभागणी ८ महिन्यात केलेली आहे. परंतु त्याच महिन्यात अतिरीक्त आकार लावण्यात आला आहे. ग्राहकाचा वापर १२० - १६० युनिट प्रति माह असल्यामुळे त्या युनिटवर अतिरीक्त आकार लावण्यात यावा. कंपनीने लावलेला अतिरीक्त आकार चुकीचा आहे .ग्राहकाने खालील मागणी केलेली आहे.

१ ) माहे फेब्रुवारी २०१५ चे विज बिल रदद करुन सुधारीत दुरुस्त करुन विज बिल देण्यात यावे.

२ ) मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणून १७००/- भरपाई देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) तथा नोडल ऑफीसर यांचे म्हणणे.

कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामिण मंडळ, महावितरण, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक २१ एप्रिल २०१५ पत्रातील म्हणण्यानुसार ग्राहकाचे मिटर ०१.१२.२०१२ मध्ये बदलण्यात आले. नविन मिटर क्रमांक २४८३६३ असा आहे. हे आय .आर मिटर आहे . सदर मिटरचे रिडींग एच.एच.यु. व्दारे

कनेक्टीव्हीटीच्या अडचणीमुळे या ग्राहकाची रिडींग ही डाऊनलोड होत नाही असे मिटर रिडींग संस्थेकडून विचारणा केल्यानंतर समजले . त्यामुळे ग्राहकास सरासरी देयके जात होते व त्यानंतर रिंडीगचे देयक झालेले आहे. २०१४ मध्ये जुलै २०१४ ते जानेवारी २०१५ पर्यन्त सरासरी विज देयक देण्यात आले . माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये ५०९३ - ३३९२ = १४४७ युनिटचे देयक ८ महिन्यात विभागुन व सरासरी देयकाची वजावट करुन देण्यात आले . त्याचप्रमाणे मार्च २०१५ चे देयक सुध्दा रिंडीगनुसार देण्यात आले. शेवटी ग्राहकाचे विज देयक हे रिंडीगनुसार असल्याने ते योग्य आहे . तरी तक्रार रदद करावी अशी मागणी कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामिण मंडळ, महावितरण , औरंगाबाद यांनी केलेली आहे.

ग्राहक गा-हाणे निवारण मंच यांचा निष्कर्ष

अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे वेगवेगळया सुनावणी दरम्यान लेखी व तोंडी मंचाने ऐकून घेतले . गैरअर्जदार यांनी जुलै २०१४ ते जानेवारी २०१५ या कालावधीचे देयक फेब्रुवारी २०१५ मध्ये दुरुस्ती करुन दिलेले आहे. जुलै २०१४ ते जानेवारी २०१५ या सात महिन्याच्या कालावधीत मिटर रिंडीग न घेता सरासरी युनिटवर आधारीत विज देयक देण्यात आले होते. महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग याचे दिनांक २० मे २०१४ चे कलम ७ ( २ ) नुसार कृषि ग्राहकासाठी कमीत कमी तिन महिन्यातुन एकदा आणि इतर ग्राहकासाठी कमीत कमी दोन महिन्यातुन एकदा मिटर रिंडीग घेणे आवश्यक आहे. सदर कामात मिटर रिंडीग घेणा-या संस्थेने दिरंगाई केल्याचे दिसुन येते. मिटर रिंडीग घेणा-या संस्थेच्या कामावर संबधित महावितरणच्या अधिका-याचे नियत्रंण दिसत नाही. त्यामुळे सदर सेवा दोषपूर्ण आहे. वरील वस्तुस्थितीचा विचार करता मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१ ) महावितरण कंपनीने दुरुस्त केलेल्या सुधारीत देयकानुसार अर्जदाराने विज देयकाचा भरणा करावा.

२ ) मिटर रिंडीग घेणा-या संस्थेवर वेळेवर मिटर रिंडीग न घेतल्यामुळे कायदेशीर कार्यवाही महावितरण कंपनीने करावी.

पान क्र.४/-

३ ) अर्जदाराने मानसिक त्रासापोटी रुपये १७००/- नुकसान भरपाईसाठी महावितरण कंपनीकडे रितसर अर्ज करावा.

४ ) केलेल्या कार्यवाहीचा आदेशाचा अनुपालन अहवाल ३० दिवसात मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | विलासचंद्र. सु. काबरा | नामदेव रा.गांधले |
| अध्यक्ष | सदस्य | सदस्य/सचिव |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामिण / ५५३ /२०१५/ १६ दिनांक :-

प्रति,
श्री. विष्णु किसनराव दवणे,
आर ६ / २९, एस.टि. कॉलनी,
अयोध्दानगर, बजाजनगर, औरंगाबाद.
ग्राहक क्रमांक ४९२१३०३६९७०७.

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रमिण / ५५३ / २०१५ / १६ )

आपण दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

प्रति,सविनय सादर
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रति,
कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. ग्रामिण मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
प्लॅाट नं १२,शिवकृपा, विजयनगर,छावणी,
नागपुर ४४००१३
फोन नं. (०७१२)२०२२१९८ - E-mail – cgrfnz@gmail.in /
sectretaryombudsmannagpur@gmail.com